# मुकुल माधव फाउंडेशनच्या सायक्लोथॉनसाठी पुण्यातील रुग्णालयांचे सहकार्य

**पुणे । प्रतिनिधी**

मुकुल माधव फाऊंडेशनने (एमएमएफ) फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने व बायसिकल एंजेल्स या ना-नफा तत्त्वावरील सामाजिक उपक्रमासह पुणे ते रत्नागिरी या सायक्लॉथॉनचे आयोजन केले असून समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. ८ डिसेंबर २०१५ रोजी सुरू होऊन ते १२ डिसेंबर २०१५ पर्यंत ते चालेल. दोन व्यावसायिक सायकलपटू या अनोख्या कार्यक्रमात उपस्थित असतील.

हा कार्यक्रम मुकुल माधव फाऊंडेशनचा एक उपक्रम असून फिनोलेक्स पाईपने आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत तो प्रायोजित केला आहे आणि अशोक लेलँड हे याचे ट्रॅव्हल पार्टनर असणार आहेत. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात अनेक कार्यक्रम होणार असून त्यात बायसिकल एंजेल्सच्या वतीने गरजू व्यक्तींना उपजीविकेसाठीच्या सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या सहकार्याने एमएमएफ शिरवळ, उंब्रज, कोकरूड आणि पाली येथील चार जिल्हा परिषद शाळांमध्ये वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करणार आहे. राकेश बक्षी (बायसिकल एंजेल्सचे संस्थापक, चित्रपट निर्माते आणि 'दि डायरेक्टर्स डायरीज'चे लेखक) आणि प्रा. राम धिल्लाँ (इंग्लंडमधील प्रसिद्ध कान-नाक-घसा तज्ज्ञ) हे दोन व्यावसायिक सायकलपटू तसेच एमएमएफची सीएसआर टीम हा प्रवास करणार आहे. आरोग्य शिबिरामध्ये २० हून अधिक डॉक्टरांचे पथक सामील होणार असून त्यात केईएम इस्पितळातील पेडियाट्रीक विभागाचे पथक, भारती हॉस्पिटलच्या ऑडियोलॉजी, स्पीच व डेंटल विभागाचे पथक आणि एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलमधील नेत्ररोग विभागाचे पथक यांचा समावेश आहे. मुकुल माधव फाऊंडेशनच्या संनियंत्रणाखाली असलेल्या ३१७१ मुलांची यावेळी हे डॉक्टर तपासणी करणार आहेत. तसेच आरोग्य शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक नवीन विद्यार्थ्याचे नाव संनियंत्रणासाठीच्या यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे आणि नंतर त्यांच्या आरोग्याबाबत त्यांचे पर्यवेक्षण करण्यात येईल.